सायं.दैनिक
आवाज जनसामान्यांचा..
बीड
# किसान
• संपादक : शेख कामरान •



१२ वी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना बी. टेक (फूड टेक) तसेच बी.एस्सी. (ऑनर्स) ॲग्रीकल्चर पदवी घेवून सर्व क्षेत्रात हमखास १००% नोकरीची संधी.
आतापर्यंतच्या उत्तीर्ण सर्व बॅचेसचे १००% प्लेसमेंट
"अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू)
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मान्यताप्राप्त
अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय
म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड - ४३१ १५३
कॉलेज ऑप्शन नंबर - बी. टेक. (फूड टेक.) - १६१७७ आणि बी.एस्सी (ऑनर्स) ॲग्री - ११२९३.
फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा ऑप्शन एक नंबरला देणे
ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याचा अंतिम दि. १७ जुलै २०२५
प्रवेशासाठी संपर्क कार्यालय :- सागर हाईट्स, बस स्टँड समोर, बीड - ४३१ १२२
संपर्क क्र. :- ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८४२०१४ / ७५८८०८२०३४ / ९९४१००१२१२



बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ६९ ▪ मंगळवार, दि. १५ जुलै, २०२५ ▪ पोस्टल दिनांक १६ जुलै, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-69 ▪ Tuesday 15 July, 2025 ▪ Postal Date 16 July, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2


# नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज म्हणाले
# २५ कोटीच्या गुत्तेदारीसाठी गडाची बदनामी!

## नारायण गडाचा वाद चव्हाट्यावर; महंतांनी सगळच बाहेर काढलं

### गडाकडे वाकडी नजर करणाऱ्यांना सोडणार नाही; शंभर तरुणांची कमेटी नेमणार

### मालमत्ता विकल्याचा आरोप करणाऱ्यांनीच पैसे कोणी घेतले हे सांगावे महाराजांचे आवाहन

बीड । किसान न्युज

**मागील काही दिवसांपासून विश्वस्त आणि नारायण गडाचा वाद सुरू असून, आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. पण हा वाद आता चव्हाट्यावर आला असून आज मठाधिपती शिवाजी महाराज यांनी पुढे येत आज माध्यमांशी संवाद साधला यावेळी त्यांनी सगळंच बाहेर काढल्याने हा वाद चव्हाट्यावर आला आहे. त्यांनी गडाची मालमत्ता विकल्याचा आरोप करणाऱ्यांनीच पैसे कोणी घेतले हे सांगावे असे आवाहन केले. गडाची बदनामी नको म्हणून शांत होतो पण समाजानेच मला बळ दिले त्यामुळे समोर येऊन बोलतो आहे. आता गडाची विश्वस्त कमिटी नेमणार असून त्या १०० गावातील १०० तरुण असतील असे सांगत, यापुढे गडाकडे वाकडे बोट दाखविणाऱ्याना सोडणार नसून ही नवीन कमेटीच सर्व काम पाहील अन् भक्तांचा असो की, शासनाचा प्रत्येक रुपया गडासाठीच वापरणार असे सांगितले आहे.**

बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळखले जाणाऱ्या नारायण गडाचे जिल्ह्यात अनेक भक्त आहेत. हे भक्त तन, मन धनाने गडाची सेवा करतात. त्यांच्यामुळेच गडाची प्रगती झाली आहे. या गडाच्या विकासासाठी दिवंगत नेते विनायक मेटे यांनी शासनाकडून २५ कोटींचा निधी मंजूर करुन आणला, त्यानंतर मनोज जरांगे यांनी पाठपुरावा करुन हा निधी मिळवून घेतला. पण ज्यांना सहकार्य करीतल म्हणून मी मदतीसाठी नेमलेली विश्वस्त ट्रस्टीच या २५ कोटींच्या कामाचं गुत्त न मिळाल्याने गडाची आणि गडाच्या गादीची बदनामी सुरू केली असल्याने मोठ्या वेदना होत आहेत. ही बाब अंतर्गत होती तो गुत्तेदार गडाला काही देणगी देणार असल्याने त्यांना काम दिले. तुम्ही द्या आम्ही तुम्हाला काम देऊ असे सांगितले पण ऐकले नाही. आणि विविध आरोप करुन गडाला बदनाम करने सुरू केले. यामध्ये त्यांनी दोन नावेही सांगून टाकली. ही तप भूमी असून गडासाठी मी प्राण देण्यासाठी तयार आहे. तर गडाने शाळा बांधल्या असून, त्या गावांची नावेही सांगून मोठे काम केले. पण हे न पहाता काहींनी पत्रक काढून गडाने मालमत्ता विकली असा आरोप करीत त्यावर सह्या कोणी केल्या, पैसे कोणी घेतले हे ही सांगा असे आवाहन केले. या आरोपांनी आणि बदनामीने मी दुःखी झालो असून दोन-दोन दिवस जेवण केले नाही. पण शांत कधीपर्यंत बसणार म्हणून समाजाने बळ दिले आणि मला बोलण्यास भाग पाडले आहे. त्या बळामुळे पुढे येऊन बोलत आहे. माझं नातं आता फक्त गडाशी आहे असे सांगितले. येणारा एक-एक रुपया हा फक्त गडाच्या विकासासाठी वापरणार आहे. गडात तुम्हाला चुकीचे दिसत असेल तर आवशय प्रश्न विचारा असे आवाहन केले. गडाशी जोडलेल्या गावांचा दौरा करून १०० गावातील १०० तरुणांची कमेटी नेमणार आहे. तेच यापुढे काम पाहतील असेही सांगितले. तसेच काहींनी पुतळा बसविण्यासाठी पैसे गोळा केले पण पुतळा काही बसला नाही. मग तो पैसा गेला कुठे असा प्रश्न उपस्थित करीत मठाधिपती शिवाजी महाराज यांनी सगळच बाहेर काढले आहे.



# शनिवार पासून मोठ्या जनावरांची खरेदी बंद!

## जिल्ह्यातील कुरेशी समाजाचा एकमुखी निर्णय

### भाकड गायी, म्हातारे, काम न करु शकणारी जनावरांचे करायचे काय शेतकऱ्यांपुढे प्रश्न



बीड । किसान न्युज

जिल्ह्यातील जामियतूल कुरैशी संघटनेच्या वतीने काल सायंकाळी केज येथे बंद बैठक घेऊन यामध्ये मोठे जनावरे जसे गाय, म्हैस,बैल खरेदी न करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. याची अंमलबजावणी येत्या शनिवार (दि.१९) पासून करण्यात येणार आहे. या निर्णयाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसणार असून, भाकड गायी, म्हशी, म्हातारे अथवा काही अपघातात पाय तुटलेले यामुळे काम न करु शकणाऱ्या या जनावरांचे करायचे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची या निर्णयामुळे आणखी कोंडी झाली आहे. राज्यात गोवंशीय जनावरांच्या संरक्षणासाठी कायदा असून, याच कायद्याचा आधार घेत गौर क्षणाच्या नावाखाली अनेक टोळ्या उदयास आल्या आहेत. ते बेकायदेशीर घरा पर्यंत तसेच रात्री अपरात्री रस्त्यावर थांबून जनावरे घेऊन जाणारे वाहन अडवून मारहाण करीत आहेत. जनावरे विक्रीसाठी बाजारात जात असले तरी » पान २ वर

## शहरातील आरक्षित भूखंडावर प्लॉटींग

# भूमाफियांचा अब्जावधींचा घोटाळा संदीपभैय्यांनी विधानभवनात उघड केला



मुंबई । किसान न्युज

नगरपालिका प्रशासन, नगर रचना विभाग आणि रजिस्ट्री कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून भ्रष्टाचार करत बीड मधील भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील प्लेग्राउंड असो की मंदिर अथवा गार्डन किंवा महिला स्वच्छतागृह या सगळ्यांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून या भूमाफियांनी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवत अब्जावधींचा घोटाळा केला आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरिक आणि शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या भूमाफियांचे कारनामे पुराव्या सकट सभागृहात मांडले असून पुढील दोन महिन्यात याबाबत कारवाई करून संबंधित भूमाफिया यांच्यासोबतच अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन नगर » पान २ वर

### येथील भूखंडावर प्लॉटींग

**बीड नगरपरिषद अंतर्गत सर्वे नंबर २९ तरफ माळी सर्वे नंबर १९४ तर बलगुजर सर्वे नंबर १९७ १९८ १९९ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी व इतर, सर्वे नंबर ३४ ३५ ६८ ६९ ७९ तरफ गिराम, सर्वे नंबर १७३ तरफ बलगुजार, सर्वे नंबर ५३ सर्वे नंबर ५६ ५९ सर्वे नंबर १८८ तरफ पिंगळे, सर्वे नंबर १६ सर्वे नंबर १७ तरफ देशमुख सर्वे नंबर १५१ सर्वे नंबर १५२ तर बोबडे या सर्वे नंबर मध्ये भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात आरक्षित असलेले भूखंड विक्री केले आहेत किंवा चुकीचा लेआउट मंजूर करत भूखंड आरक्षित ठेवलेले नाहीत विशेष बाब म्हणजे प्लेग्राउंड आणि इतर गोष्टींसाठी आरक्षित केलेली जागा या ठिकाणी विक्री करून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार आ.क्षीरसागर यांनी सभागृहात उघड केला आहे.**

# गर्दीतला चेहरा



वाढदिवस विशेष । कामरान शेख

**कितीही ट्रोल करा, आरोप करा पण काम एक काम यावरच लक्ष देत अडचणीत असणाऱ्यांच्या मदतीला धावून जात काम करण्याची सवय असल्याने कोणीही अडचणीत असेल तर त्यांच्यासमोर एकच नाव येतो तो म्हणजे धनू भाऊ यामुळे आ. धनंजय मुंडे यांचे दरबार नियमित माणसांनी भरलेला असतो. यामुळे धनंजय मुंडे यांना सर्वाधिक गर्दीतला चेहरा म्हणून ओळख निर्माण केली असून, या जनसामान्यांच्या आशीर्वादामुळे ते कोणत्याही संकटाला ते घाबरत नसल्याचे दिसून येत आहे.**

धनंजय मुंडे यांचे चुलते लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या माध्यमातून राज्याची सुत्रे हालत होती. यामुळे कोणतेही पद मिळवायचे म्हणजे साधी गोष्ट होती, सर्व काही असतानाही पण धनंजय मुंडे यांनी आयत्या पिठावर रेघोट्या न मारता संघर्ष करत आपल्या राजकारणाची सुरुवात जिल्हापरिषद पासून केली. तसेच पक्षाचे पदही घेताना युवा मोर्चा पासून कामाला सुरुवात केली. यामुळे धनंजय मुंडे यांना ग्राउंड लेवल पासून शेतकरी, मजूर सह गावपातळीवर अडीअडचणींचा अभ्यास आहे. उंच शिखर गाठण्यासाठी आपला पाया मजबूत असणे आवश्यक आहे हे ओळखून त्यांनी मातीशी आपले नाते तुटू दिलं नाही. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपल्या राजकारण आणि समाजकारण सुरू ठेवले आहे. यामुळेच त्यांना मागे वळून पाहाण्याची गरजच भासली नाही. अडचणीत असलेला माणूस आपल्याकडे आला की, त्याची जात, धर्म न पहाता त्याची अडचण सोडवून त्याचे समाधान करणे हा नियम कटाक्षाने पाळला यामुळे त्यांचा दरबार हा नेहमीच माणसांनी खचाखच भरलेला असतो. जाती पातीला थारा न देता काम करणे हे गुण असल्यानेच त्यांचा विजय हा दीड लाख मतांनी झाला हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही. पण मधील काही काळात धनंजय मुंडे यांना एका जातीचा शिक्का मारुन त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला गेला, सोशल मीडियावर त्यांच्या विरोधात मोहीम उघडून मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले. काहीही विचार न करता चक्क काहींनी तर त्यांना दोषीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. पण याला ही त्यांनी न जुमानता शांत राहून या प्रकरणाला तोंड दिले. ते यात तथ्य नाही हे जाणून असून सामान्य माणसाला याची जाणीव असल्याने आणि त्यांची बांधिलकी समजून काम करीत त्यांनी शेतकरी, सोशीत, मजूर यांना उघडे पडू न देता आपले काम करीत यातूनच ट्रोल करणाऱ्यांना उत्तर दिले. सामान्य माणूस आजही धनु भाऊ सोबतच दिसत असून आजही कोणाला कोणतीही अडचण असेल तर त्यांच्या समोर धनु भाऊ हे एकच नाव येतं आणि येथे गेले की, आपली समस्या सुटतेच असा विश्वास असल्याने आजही प्रत्येक जाती धर्मातील माणूस विश्वास आणि हक्काने धनु भाऊ कडे कामे घेऊन जातो आहे. यामुळे आजही त्यांचा दरबार भरलेला आहे. त्यांच्या लोकप्रियेतेवर कसलाच परिणाम झाला नाही. ते जातील तिथेही कामे घेऊन आलेल्या माणसांची गर्दी असते यामुळे **आ. धनंजय मुंडे यांना गर्दीतला चेहरा म्हणून ओळखले जाते.**


